2020-21

ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

Hi-Tech Research Analysis

EDITOR IN CHIEF
DR. BALAJI KAMBLE

9

# मराठाकालीन राजकीय प्रभावशाली स्त्रियांचा ऐतिहासिक अभ्यास

डॉ. रामचंद्र पांडुरंग पवार
इतिहास विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड

## Research Paper - History

देश, राज्य, समाज, संस्कृती यांचा अभ्यासविषय स्त्रियांच्या समावेशाशिवाय अपुरा असतो. अर्थात इतिहास लिहीतांना अनेक वेळा हा प्रमाद घडलेला दिसून येतो. पुर्णाशांने नसला तरी बऱ्याच अंशी हे विधान सत्य आहे. स्त्रियांचे कर्तृत्व कमी लेखून त्यांना इतिहासानेही अनुल्लेखाने मारण्याचे पातक आजपर्यंत घडत आलेले आहे. वास्तविक प्राचीनकाळापासूनच स्त्रियांनां धर्म, अर्थ, संस्कृती, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात आपला ठसा उमटविलेला आहे. त्याची म्हणावी तेवढी व म्हणावी तशी दखल इतिहासाने घेतलेली नाही. तेव्हा कोणत्याही समाजातील अर्धा भांग व्यापलेल्या स्त्रीजातीच्या कर्तृत्वाला तिच्या त्या-त्या क्षेत्रातील कामगिरीचा अभ्यासकरुन न्याय देण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. मराठा कालखंडातही स्त्रियांनी विविध क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. त्या काळाला अनुसरुन शिवकाळात राजकीयदृष्ट्या तर पेशवेकाळात धर्मक्षेत्रात त्यांचे कर्तुत्व प्राधान्याने उठावदार दिसून येते. या काळातील स्त्रियांच्या साक्षरतेवियषी प्रश्नचिन्ह असले तरी त्या ज्ञानलालसी होत्या, ज्ञानाचे त्यांना आकर्षण होते हे पेशवे दप्तरातील उल्लेखावरुन स्पष्ट होते. ज्ञान श्रवण करुन त्या आपली भुक भागवित असल्याने दिसते. पेशवे बाजीराव यांची आई राधाबाई यांचेसाठी पाठविलेल्या पुस्तकासंदर्भातील पिलाजी जाधवांचा भाऊ संभाजी जाधव यांचे पत्र याठिकाणी उल्लेखनिय ठरते. "वडिली पत्र पाठविले व आदिपर्व पुस्तक पाठविले ते पावले दोन पर्वे राहिली ते पंधरा दिवसांत पाठवितो म्हणून लिहिले तरी बरे, श्रवण करुन सावकाश पाठविली पाहिजेत. आणखी पर्वे लागतील ते आज्ञा करावी, पाठवून देऊ."[१] यावरुन या काळातील स्त्रियांना पुस्तक वाचनाची आवड होती. हे दिसून येते-त्याच बळावर त्यांनी राजकारणातही आपला ठसा उमटविला होता.

मराठा कालखंडाचे निर्माते, ज्यांना युगपुरुष म्हटले जाते त्या शिवाजी महारांना जन्म देणारी जिजामाता यांचे कर्तृत्व अवर्णनीय होय. राजे शहाजी भोसले यांनी पुण्याकडील जहागिरीची व्यवस्था लावण्यासाठी पाठविलेल्या बालशिवबांना 'राजे' बनविण्यात सिंहाचा वाटा जिजामातेचा होता. बाल शिवाजीला त्यांनी बौध्दीक, शारिरीक, लष्करी शिक्षण दिले. दादोजी कोंडदेव यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीने जहागिरीचे पुनर्वसन केले मात्र याची दिशा दाखविली ती जिजाबाईंनीच ! शिवाजी महाराजांसंदर्भात जिजाइंची भूमिका आई, वडील, शिक्षक, मार्गदर्शक अशी सार्वत्रिक होती. स्वतःच्या माहेरची झालेली वाताहत, सासरचा पराक्रम पुराणातील तेजस्वी कथा सांगून शिवबांना घडविण्याचे महान कार्य त्यांनी केले. अफजलखान वधाचे वेळी स्वराज्याची जबाबदारी शिवरायांनी त्यांचेवरच सोपविली होती. पुढे शाहिस्तेखानावरील छापा असो की, सुरतेची लूट असो किंवा आग्रा भेट असो महाराजांच्या अनुपस्थितीत स्वराज्य जिजामातेनेच सांभाळले. थोडक्यात महाराजांचा उदय होण्यास जिजामाताच कारण झाल्या. त्यांना शहाजींचा मुक आशिर्वाद होता तर जिजामातेचे उघड उघड प्रोत्साहन होते.[२]

अशारितीने स्वराज्याची /मराठे शाहीची पायाभरणी झाल्यानंतर या राज्यावर औरंगजेबाचे रुपाने महान संकट कोसळले. त्या काळात त्याला चोख उत्तर देण्याचे कर्तृत्व गाजविण्याज्यांमध्ये संभाजी राजांची पत्नी राणी येसूबाई या धिरोदात्त स्त्रिचा उल्लेख करावा लागेल. राजारामाला कार्यप्रवृत्त करण्याचे कार्य या स्त्रिने केले. प्रत्यक्ष रणांगणावर आणि राजकारणात यावेळी राणी ताराबाईने आपला अमिट ठसा उमटविला. २ मार्च १७०० रोजी राजारामाच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी ताराबाई हिने सत्तासुत्रे स्विकारली* आता मराठे सहज शरण येतील अशी धारणा करुन बसलेल्या औरंगजेबाची कबर दक्षिणेतच खोदण्याचे कर्तृत्व ताराबाईंनी गाजविले. काळाला अनुरुप अशी रणनिती आरखुन बुडते राज्य वाचविले. अतिशय विषम परिस्थीतीत बलाढ्य अशा बादशाहीला तोंड देण्याचे महान कार्य केले. कमी व दरिद्री सैन्य, रिकामा खजिना, नेतृत्वहिन राज्य अशा स्थितीत सारा महाराष्ट्र एक ठेवला. उपलब्ध मनुष्यबळाची मदत घेवून औरंगजेबाला 'दे माय धरणी ठाय' करुन सोडले.[३] शिवकाळातील या कर्तृत्ववान स्त्रियांप्रमाणेच पेशवाईतही अनेक प्रभावशाली स्त्रियांनी राजकारणासह समाजकारणावर आयला ठसा उमटविला. शाहुच्या काळात पेशवे बाळाजी विश्वनाथाची पत्नी राधाबाई हिचे कर्तृत्व उल्लेखनिय ठरते. आपली मुले चिमाजी आप्पा आणि थोरला बाजीराव तिचा सल्ला घेत असत. आंग्रे, जाधव, निंबाळकर या सर्वांवर तिचा प्रभाव होता. गोविंद हरी पटवर्धनाला प्रायश्चित्त देण्यामध्ये तिने घेतलेल्या पुढाकारातून तिच्या कर्तृत्वाचा परिचय होतो. पटवर्धनांनी समाजबंधन झुगारुन खालच्या जातीतील बटीक ठेवल्याकारणाने ब्राम्हणांनी त्याला वाळीत टाकले असता, पेशव्यांच्या अनुपस्थितीत राधाबाईंनी पटवर्धनास प्रायश्चित्त देवविले. याप्रसंगी आपला नातू पेशवा

नानासाहेबांस पाठविलेले पत्र पुढीलप्रमाणे :- "चि.रा.रा.नाना यांस-"

प्रती राधाबाई आशीर्वाद-------

राजश्री गोविंद हरी यांचे घरी बटीक महारीण निघाली. -------- त्यांचे घरी मुलामाणसांचा कुपोषणाने आट जाला. याकरिता आम्ही थोर थोर पंडित व वैदिक जमा करुन, बालंभट यांस प्रायश्चित्त द्यावयाचा निश्चय केला.[४] यावरुन राधाबाईचा निश्चयी व धाडसी स्वभाव दिसून येतो. प्रस्तुत पत्रात पुढे काही ब्राम्हणांनी हा अधिकार पेशव्यांचा असल्याचे सांगताच-आम्ही सांगतो तीच प्रभुंची आज्ञा समजावी असे खडसावले. यावरुन राधाबाईंचे निर्तीधर्य दिसून येते. अस्पृश्यतेचे अवास्तव महत्व त्यांनी त्याकाळातही नाकारल्याचे स्पष्ट होते.

पेशवा बाळाजी विश्वनाथ व राधाबाईची मुलगी अनुबाई घोरपडे ही स्वत:चा मुलगा २०-२१ वर्षाचा असतांनाच १७४५ मध्ये विधवा झाली. तेव्हा तिने मोठ्या हिंमतीने, कर्तृत्वाच्या बळावर आपल्या इचलकरंजीच्या लहानशा जहागिरीचे रुपांतर मोठ्या दर्जेदार संस्थानात केले. पेशव्यांसाबेत ती मोहीमांवर आपल्या पुत्रासमवत स्वत: उपस्थित राहात असे. अशाच प्रकारे शाहुचे सेनापती दाभाडे घराण्यातील उमाबाई दाभाडे हि एक प्राक्रमी स्त्री होती. त्रिंबकरावास पेशवा बाजीरावाने १७३१ च्या डभोईच्या लढाईत ठार मारल्यानंतर आपल्या अल्पवयीन पुत्रांसमवेत उमाबाईने राज्यकर्ते पदासोबतच सेनापतीपदाचीही जबाबदारी मोठ्या कर्तृत्वाने सांभाळली. १७३२ साली मोगलांकडील ८० हजार रुपये वसुल करण्यासाठी अहमदाबादवर स्वारी केली. तेथील सरदार जोरावरखान बाबी याला पळवून लावले. दंड फिहेपर्यंत त्यांनी खानाच्या मुलास ओलीस ठेवले.[५] यानंतर शाहुने साताज्यास दरबार भरवून उमाबाईचा गौरव केला. वस्त्रालंकार देवून पायात सोन्याचे तोडे घातले. गुजराथमध्ये मराठ्यांची सत्ता स्थिर करण्याचे महान कर्तृत्व उमाबाईने गाजविले.

याकाळातील इतिहास ज्यांच्या उल्लेखाशिवाय पुर्ण होऊच शकणार नाही त्या आहिल्यादेवी होळकर धर्म, राज्यकारभार, न्यायीपणा, मुत्सद्देगिरी, दानशरपणा, पराक्रम या सर्वच क्षेत्रात अग्रेसर असल्याचे इतिहास सांगतो. राघोबादादांनी लोभाने त्यांचे जहागिवर स्वारी करण्याचे ठरविले असता मुत्सद्दीगिरीचा प्रश्न त्यांनी विचारला व त्यांना युध्दशिवाय निसत्तर केले. "आम्ही स्त्रिजात-आमचा पराभव झाल्यास कोणी नांव ठेवणार नाही, पाण सर्वजणात तुमचे हसे होईल." अस सांगून परतविले.अहिल्यादेवी राष्ट्रीय भावनेच्या पुरस्कृर्त्या असल्याचे त्यांच्या एकूण कर्तृत्वातून प्रत्ययास येते. स्वत:च्या राज्याच्या हिताबरोबरच पेशव्यांशीही त्या एनिष्ठ राहिल्या. अहिल्याबाई आपल्या सैन्याबद्दलही दक्ष असल्याचे दिसून येते. त्यांनी तुकोजी होळकरांना लिहीलेली पत्रे याची साक्ष देतात. "पेंढारी लोकांस आपल्या सैन्यात ठेवू नकोस, कारण त्यामुळे आपला दुर्लेकीक होवुन पत नाहीशी होईल.[६] अशा अर्थाची अनेक पत्रे आहिल्याबाईच्या सैन्य-विषयक जागृततेची साक्ष देतात. प्रजाकल्याणाचे कंकण बांधुन या राज्यकर्त्या स्त्रिने आपल्या कर्तृत्वाच्या बळावर इतिहासात आपले

स्थान अधोरेखित केले.

सारांश म्हणजे स्वतः राजपदावर न बसता अनेक स्त्रियांनी विशेषतः आपल्या अल्पवयीन मुलांमार्फत राज्यकारभार उत्तमरित्या चालविल्याचे दिसून येते. राजकारणपटुत्व, मुत्सद्देगिरी, पराक्रम, धाडस, नितीधैर्य, प्रसंगावधान, कटुनिती अशा विविध गुणांनी युक्त अशा मार्गांनी त्यांनी त्या-त्या काळात आपल्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविलेला दिसून येतो. भा.रा.तांबे यांच्या शब्दात 'भूतकाळ स्त्रियाच्या उदरातून जन्म घेतो, वर्तमानकाळ तिच्या पायी लीन होतो आणि भविष्यकाळ रात्रदिवस तिच्या हाकेसाठी तिष्ठत असतो.' एवढे स्त्रिसामर्थ्य या स्त्रियांनी दाखविले, हेच विविध घटनांवरुन सिध्द होते.

## संदर्भ सूची :-

१) भावे, वा.कृ.-पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, ३५. फिरोझशहापथ, नवि दिल्ली-१९३५ पृ.१०७

२) पंडीत, प्रा.भवानिशंकर - महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्यावर व संस्कृतीवर झालेला परिणाम, प्रका.व.ह.गोळे, कुलसचिव. पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे १९६९, पृ.९४

३) राऊत, प्रा.गणेश, राऊत, प्रा.ज्योती-महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, (१८१८ ते १९६०) डायमंड पब्लीकेशन, पुणे ३०, एप्रील २००७ पृ.१३.

४) कै.आपटे, द.वि.ओतुरकर, रा.वि.(संपा) महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, प्रका-दि.दा. गांगल, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे-३०, १९६३ पृ११८,११९

५) देशमुख, डॉ.शारदा-शिवाकाळातील व पेशवाईतील स्त्री-जीवन, प्रका.र.श्री. सरदेशपांडे, टिळक-महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९७३, पृ.२४०

६) पुर्वोक्त, पृ२४३